रयत शिक्षण संस्थेचे,

# सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,श्रीरामपूर

## अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती नवीन व नुतनीकरण नोटीस - २०२१-२०२२

## ११ वी व १२ वी कॉमर्स मधील विद्यार्थ्यांसाठी

### अंतीम मुदत वाढ ०१/१२/२०२१ ते १५/१२/२०२१

०१.१२.२०२१

ज्युनिअर महाविद्यालयातील ११ वी व १२ वी वर्गातील अल्पसंख्यांक (मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, पारसी, जैन) कॅटेगिरीतील विद्यार्थ्यांसाठी अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती **(Minority Scholarship)** अर्ज ऑनलाईन सुरु झालेले आहेत संबंधीत पात्र विद्यार्थ्यांनी **nsp.gov.in/https://scholarships.gov.in/** या वेबसाईडवर शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन भरुन सर्व कागदपत्र जोडून महाविद्यालयात दि. ०१/१२/२०२१ ते दि.१५/१२/२०२१ अखेर सकाळी ११:०० ते दुपारी १:०० वाजेपर्यंत जमा करावे. **अनुदानित तुकडीतील विद्यार्थ्यांनी ( M+F ) अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीचा अर्ज भरुन दिला तर अशा विद्यार्थ्यांना पेईंग प्रमाणे फी भरावी लागेल तसेच अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीचा अर्ज भरुन देणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाच्या इतर कोणत्याही फी सवलतीचा किंवा शिष्यवृत्ती / फ्रि-शिपचा अर्ज भरता येणार नाही याची संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

**विद्यार्थ्यांनी १५/१२/२०२१ या अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसाची वाट न पाहता लवकरात लवकर अर्ज ऑनलाईन भरुन महाविद्यालयात जमा करावा.**

तसेच मागील वर्षी ( सन २०२०-२१ ) अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती मिळालेली असल्यास अशा विद्यार्थ्यांनी पात्र असल्यास सदर अर्ज नुतनीकरण करावा.

अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीचे महाराष्ट्र राज्यासाठी ४७५७५ एवढे संच केंद्र शासनाने निर्धारित केलेले आहे. त्यामुळे अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीचे अर्ज भरणाऱ्या सर्वच विद्यार्थ्यांना अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती मिळत नाही. याची संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**अर्ज भरल्यानंतर खालीलप्रमाणे कागदपत्र अटेस्टेड किंवा सेल्फ अटेस्टेड करुन जोडावीत**

| | |
|---|---|
| १ | ऑनलाईन भरलेला अर्ज. |
| २ | अल्पसंख्यांकबाबतचे स्वत: प्रमाणित केलेले स्वयंघोषित प्रमाणपत्र व महाविद्यालय व्हेरिफिकेशन अर्ज. ( सदर अर्ज कॉलेज जवळील झेरॉक्स दुकानामध्ये मिळतील ) |
| ३ | शाळा सोडल्याचा दाखला झेरॉक्स |
| ४ | डोमासाईल सर्टिफिकेट / रहिवासी दाखला झेरॉक्स |
| ५ | रेशन कार्ड झेरॉक्स |
| ६ | आधार कार्ड झेरॉक्स |
| ७ | आधार कार्ड लिंक फॉर्म झेरॉक्स |
| ८ | सन २०२१-२२ मधील प्रवेश पावती झेरॉक्स |
| ९ | सन २०२०-२१ चा वडीलांचा ओरीजनल उत्पन्नाचा दाखला. वार्षिक उत्पन्न २.०० लाख रु.च्या आत. **(ओरिजनल उत्पन्न दाखला तहसिल कार्यालयाकडील )** वडील मयत असल्यास आईचा उत्पन्नाचा दाखला तसेच वडीलांचा मृत्युच्या दाखल्याची झेरॉक्स जोडणे. |
| १० | दहावी व त्या पुढील सर्व गुणपत्रक ( मागील परीक्षेत किमान ५० टक्के गुण आवश्यक ) झेरॉक्स |
| ११ | बँक पासबुक झेरॉक्स |

प्र. प्राचार्य,
सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर

सदर सूचना महाविद्यालयाच्या वेबसाईटवर देखील टाकण्यात आलेली आहे. **www.cdjcollege.com**